# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०९/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २७/०९/२००६ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. १६/०९/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ८) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १३) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १४) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| २) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वजण ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास मला सहकार्य कराल अशी आशा बाळगतो आणि सभेला सुरूवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९७ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सभापती पदाच्या निवडीच्या कार्यक्रमानुसार दि. २१/०९/२००६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी १.०० वाजेपर्यंत नाम निर्देशन पत्रे भरायचे होते. याच्यासाठी श्री. स्टिवन जॉन मेंन्डोसा यांच्या उमेदवारीचे पत्र आलेले होते. श्री. स्टिवन मेन्डोसा हे निवडणूकीसाठी एकच उमेदवार असल्याने निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याऐवजी एकच उमेदवार असल्याने सभापतीचा जो ठराव आहे. त्याचे मी वाचन करतो. (ठरावाचे वाचन केले.) श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा हे स्थायी समितीचे सभापती झाल्याचे मी सभापतींच्या वतीने जाहिर करतो. आता श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा यांची सभापती पदासाठी निवड झालेली आहे. त्यामुळे आता माजी सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे यांनी श्री. स्टिवन जॉन मेंन्डोसा यांना त्यांच्या सभापती पदावर बसवावे अशी मी विनंती करतो. मी प्रशासनाच्या वतीने श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) हे नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा आणि मावळते सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांचे पुष्पगुच्छ देउन हार्दिक स्वागत करत आहेत.

प्रकरण क्र. ९७ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००६-०७ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

ठराव क्र. ९९ :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००६-२००७ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणूक करावयाची असल्याने निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन पत्र मागविली असता (१) श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा ह्यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले. नामनिर्देशन पत्र एकच प्राप्त झाल्याने एकच उमेदवार राहिला. ''सभापती'' हे पद एकच असल्याने व उमेदवार एकच असल्याने **श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा** सन २००६-०७ सालाकरीता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता बिनविरोध निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी,**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. उप-आयुक्त (मु.) यांनी नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा आणि माजी सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांचे पुष्पगुच्छ देउन हार्दिक स्वागत केले.)

**नगरसचिव :-**

इतर उपस्थितांना मा. सभापती यांचे स्वागत करायचे असेल तर मी सभापतींच्या वतीने मी विनंती करतो. तसेच ज्या सदस्यांना सभापतींच्या अभिनंदन पर भाषणे करायची असतील त्यांना सभापतींच्या परवानगीने मी विनंती करीत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन जॉन मेंन्डोसा यांचे अभिनंदन करतो. त्याच बरोबर आपला वर्षभराचा कार्यकाल संभाळणारे श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांना धन्यवाद देतो. कारण त्यांनी वर्षभराच्या कारकीर्दित महापालिकेतील सर्व सन्मा. सदस्यांना मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरीकांना, स्थायी समितीच्या सर्व सन्मा. सदस्यांना त्यांच्या कार्यकालात योग्य न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल सभापतींचे पुन्हा एकदा धन्यवाद व्यक्त करतो. त्यांनी ज्या पध्दतीने ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात चालवलेली होती. ती त्यांची कसोटी होती, कुशलता होती. मी अपेक्षा करतो की, स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा हे स्थायी समितीच्या सर्व सन्मा. सदस्यांना या शहरातील नागरिकांना योग्य तो न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतील. एक अनुभव म्हणून मी एवढेच सांगेन आता माजी सभापतींनी जसे येतो-येतो सांगितले तसे नवनिर्वाचित सभापती आपले हे शेवटचे कामकाजाचे वर्ष आहे असे मानून त्या दृष्टीकोनातुन सभासद येण्यापूर्वी पाच-सहा मिनिटे आधी पोहोचतील आणि आपल्या सभेला सोळा सदस्य वेळेवर उपस्थित राहतील असा मी आग्रह धरतो. माजी सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली. त्याचप्रमाणे मी श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा हे नव्याने निवडून आलेले असले तरी त्यांना हे संपूर्ण सभागृह साथ देईल आणि सभापती सदस्यांना सन्मानित ठेवतील अशी अपेक्षा करतो. नवनिर्वाचित सभापतींचा कार्यकाल यशस्वी व्हावा अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि बीजेपीच्या वतीने नवनिर्वाचित सभापतींना हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद!

**जयंत पाटील :-**

आपणा सर्वांचे नवनिर्वाचित सभापती तरुण, तडफदार नेते आहेत. त्याचबरोबर, मावळते सभापतीसुध्दा उपस्थित आहेत. ते आमच्या वडीलांसारखे आहेत. आजच या नवरात्रीच्या शुभमुहुर्तावर श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा यांची बिनविरोध नेमणूक केलेली आहे. बिनविरोध नेमणूक होणे हे व्यक्तीची लोकप्रियता मान्य करुन त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवतो. आपला नगरसेवक पदाचा फारसा थोडासा कालावधी राहिलेला आहे. आपण त्याच्यामध्ये शहरातील लोकांसाठी जास्तीत जास्त मदत केस कार्य कसे करता येईल? स्थायी समितीच्या माध्यमातुन आपण हे करून दाखवूया. आम्ही ज्या-ज्या सुचना करु त्या सर्व सुचना सभापती मान्य करतील अशी अपेक्षा बाळगतो. आपल्याकडे फार थोडा कालावधी राहिलेला आहे आपण त्या कालावधीमध्ये शहरातील सर्व जनतेला सोयी-सुविधा देवू या अशी अपेक्षा करतो आणि मी माझ्या तर्फे व कॉंग्रेस पार्टी तर्फे सभापती यांना शुभेच्छा देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आदरणीय माजी सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे यांना वर्षभर खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पाडलेली होती. मा. सभापती साहेब, तुम्ही सभा चालू असताना सभापतीसारखी वागणूक न देता एखाद्या लहान भावासारखी वागणूक दिलेली होती. तुम्ही कधीही पक्षपात केला नाही. विरोधकांना देखील तुम्ही सांभाळून घेतले त्याच्या सुचना समजून घेऊन अंमलबजावणी केली. तुम्ही वर्षभर चांगली कारकीर्द पार पाडली. त्याबद्दल धन्यवाद देतो आणि तुम्हाला तुमच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो. तसेच नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा यांचे अभिनंदन करतो. तुमच्या पक्षातर्फे असेच सहकार्य राहिल अशी मी अपेक्षा करतो. आता सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलले की, आपले सभापती तरुण आणि तडफदार आहेत. मी तर तुम्हाला असे सांगतो की आम्ही तुम्हाला सहकार्य करु आणि तुमच्या बरोबर काम करु. आम्हीसुद्धा तरुण असल्यामुळे आम्हाला तुमचे सहकार्य लागेल. मी श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा यांचे अभिनंदन करतो. आपण एक असा ठसा उमटूवून टाकू की बिनविरोध निवडून येणे ही पालिकेच्या इतिहासातील गोष्ट आहे. आपण वर्षभरात काम करित असताना तुमची निवड सार्थक होईल याची दक्षता घेउया. धन्यवाद.

**रतन पाटील :-**

मा. नवनिर्वाचित सभापतींच्या परवानगीने बोलतोय, आज ह्या शहरात एक आनंदाचे वातावरण आहे. या शहरात नवरात्रोत्सव मोठ्या आनंदाने साजरा होत आहे. अशा या पावन दिनी श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा साहेब यांची सभापती म्हणून निवड होणे ही एक चांगली गोष्ट आहे. अशाप्रकारे श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा यांची या शुभ दिनी सभापती म्हणून निवड झालेली आहे. मागील वर्षभरात आमचे जेष्ठ सभापती यांनी आम्हाला विरोधक न समजता वेळोवेळी सहकार्य केलेले आहे. तसेच, जनता किंवा नागरिकांचे काम सोडविण्यासाठी निश्चितच सहकार्य केलेले आहे. आम्हाला मोठ्या भावाप्रमाणे सांभाळलेले आहे. अशा आमच्या माजी सभापतींचे आभार प्रकट करुन मिरा भाईंदरच्या विकासासाठी जी-जी कामे झालेली आहेत. त्याच्यामध्ये माजी सभापतींचा निश्चितच सिंहाचा वाटा आहे. मिरा भाईंदर क्षेत्रात नागरिकांच्या ज्या समस्या असतात. जसे पाणी रूग्णालये त्याच्यामध्ये काहीतरी कमतरता राहू शकते आपण तेवढे परिपूर्ण झालेलो नाही. आपल्या शहरातील नागरिकांच्या ज्या समस्या आहेत. आपण त्या सोडविण्यास पुढाकार घेतो. तसेच, नवनिर्वाचित सभापतींना उदंड आयुष्य मिळो आणि त्यांना कामात यश देवो अशी आई जगदंबेकडे प्रार्थना करतो.

**हंसुकुमार पांडे :-**

सभी नगरसेवको के आज खुशीका दिन है। आज नवरात्रीके शुभअवसर पर माँ दुर्गाका का आशिर्वाद मिला है। मै काँग्रेस के सभी नगरसेवकों के तरफसे गटनेता के नातेसे शुभेच्छा देता हूँ। अभी सन्मा. सदस्य जयंत पाटील ने बोला वैसे बाकी के सब लोग भी बोलेंगे। अभी हमारे नगरसेवको का लास्ट इयर है। आप इस लास्ट इयर मे सहकार्य करेंगे ऐसी अपेक्षा है। मिरा भाईंदर क्षेत्रमे जो छोटे बडे काम है। उस काम के उपर ध्यान देकर वह काम पास किजीए। हम लोगोने श्री. तुळशीदास म्हात्रेजी का कार्यकाल देखा नही है। हम लोगो ने उनकी दो-तीन मिटिंग अटेंन्ड की है। उन्होने हम लोगोको पिता समान संभाला है। वह अध्यक्ष थे तब उन्होने अच्छी तरहसे सहकार्य किया था। और आपसे भी ये उम्मीद है आप उनसे ज्यादा सहकार्य करेंगे। आप हमारे बडे भाई हो। उमर मे छोटे है लेकिन सभापती होने के नाते बडे हो, पद से। मै काँग्रेसपक्ष की तरफसे नवनिर्वाचित सभापतीको धन्यवाद देता हूँ। जयहिंद, जय महाराष्ट्र।

**शशिकांत भोईर :-**

आपल्या स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती आदरणीय श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. तसेच, आमच्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष व स्थायी समितीचे माजी सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे आम्ही त्यांच्या दोन-तीन मिटींग बघितलेल्या आहेत. त्यांनी जे काम केलेले आहे त्याची प्रत्येकाने स्तुती केलेली आहे. त्याचबरोबर, माजी सभापती यांनी शहराचा विकास करित असताना त्यांना बऱ्याच अडचणी आल्या असतील. कारण, त्यावेळेला बजेट कमी मिळाले असल्याची शक्यता असू शकते. मागच्या वर्षी जास्त बजेट खर्च झालेले होते. त्याचा भुर्दंड ह्यावर्षी पडलेला आहे. मी नवनिर्वाचित सभापतींना सांगु इच्छितो की तुम्ही बजेटची तरतुद करून मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये कुठल्या पद्धतीने नव्याने उत्पन्न मिळेल याकडे लक्ष द्या. आपले हे शेवटचे वर्ष आहे आणि आपल्या मिरा भाईंदर शहरात बरीच विकास कामे पेंडींग राहिलेली आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे की, आपल्या मिरा भाईंदर शहरात गव्हर्नमेंट हॉस्पीटल असावे अशी सगळ्यांची मागणी आहे. परंतु, आपल्याला जागेचा ताबा मिळालेला नाही. आपण हा ताबा मिळविण्याचा प्रयत्न करूया. आम्ही तुमच्या मागे असू. मेन्डोसा परिवाराचे प्रेम मिरा भाईंदर शहराच्या इतिहासात बिनविरोध निवड झालेली आहे. बिनविरोध निवड झाली म्हणून आपण आपल्या जनतेला लवकरात लवकर हॉस्पिटल सुरू करण्यासाठी जास्तीत जास्त वेळ खर्च करूया. आम्ही तुमच्याबरोबर सहभागी होवू. आमच्या तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत. तुमचा कार्यकाल चांगला जावो अशी अपेक्षा बाळगतो. मागील चार सभापतींनी बरीच कामे केलेली होती. मिरा भाईंदर शहरासाठी चांगली योजना आणणार आहेत. हल्ली दिवसेंदिवस पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. आपल्या महापालिकेचे पाणी चोरी केले जाते. त्याबाबत मा. महापौर, उपमहापौर आणि आपल प्रत्येक पक्षाचे गटनेते आणि सदस्य यांनी जोमाने काम करून महापालिकेचे पाणी कुठल्या पद्धतीने चोरी केले जाते, कसे चोरी केले जाते हे शेधणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर महापालिकेला कुठल्या पद्धतीने पाणीपुरवठा होतो.

दिवाळी, गणपती, दसरा या दिवसांमध्ये शहराला पाण्याचा तुटवडा जाणवतो. आपल्याला त्याचे कारण शोधावे लागेल. आम्ही तुमच्या पाठीमागे आहोत. तुमचा कार्यकाल यशस्वी होवो अशी अपेक्षा बाळगतो. मा. सभापती साहेब, तुम्हाला जे पद मिळालेले आहे. तुम्ही त्या पदाचा योग्य प्रकारे वापर कराल असे सांगून तुम्हाला पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा देतो. जय हिंन्द, जय महाराष्ट्र.

**ज्युडी डिसोझा :-**

आपले मावळते सभापती वडिलांसारखे होते असा उल्लेख मी या ठिकाणी करते. आम्ही त्यांच्या बरोबर गेले वर्षभर मिटिंग अटेन्ड केलेली होती. आपल्याला त्यांनी खरोखर सहकार्य केलेले आहे. त्यांनी कधी न रागावता मिटिंग चालवली म्हणून त्यांचे आभार मानते आणि नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन मेंन्डोसा यांना धन्यवाद देते. माजी नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेन्डोसा यांच्या आशिर्वादाने त्यांचा लहान भाउ श्री. स्टिवन मेंन्डोसा हे स्थायी समितीच्या सभापती पदावर विराजमान झालेले आहेत. त्यांना सगळ्यांचे सहकार्य लाभेल अशी माझी खात्री आहे. श्री. स्टिवन मेंन्डोसा हे बिनविरोध प्रथमच सभापती पदावर निवडून आलेले आहेत. हासुद्धा तितकाच महत्वाचा मुद्दा आहे आणि ही आनंदाची गोष्ट आहे. राष्ट्रवादी पक्षातर्फे जे सदस्य उपस्थित आहेत आणि जे सदस्य उपस्थित नाहीत त्यांच्यातर्फे व सर्व माहिलांतर्फे सभापतींचे हार्दिक स्वागत करते. मा. सभापतींच्या हातुन चांगली कामे घडो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करते आणि त्यांना शुभेच्छा देते. जय हिंद जय महाराष्ट्र.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या सभेला उपस्थित असलेले उप-आयुक्त श्री खतगावकर साहेब, सचिव श्री. हरेश पाटील साहेब, नगरपालिकेचे कर्मचारी, विविध पक्षाचे नेते, सर्व सन्मा. सदस्य व सन्मा. सदस्या आजपर्यंत मला जे त्यांनी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो. आपल्याला आपल्या शहराचा विकास करायचा आहे. आपण आजपर्यंत मला मोलाचे सहकार्य केलेले आहे. त्यासाठी सर्वांना धन्यवाद देतो. नवनिर्वाचित सभापती श्री. स्टिवन मेंन्डोसा यांना हार्दिक शुभेच्छा देतो. आपला जो उर्वरित काळ राहिलेला आहे तो सर्वांना एकत्र विचारात घेऊन येउन खेळीमेळीच्या वातावरणात नीट चालवू अशी तुम्हाला ग्वाही देतो. आपण निश्चितपणे जो मान दिलेला आहे. आमची सभा खेळीमेळीच्या वातावरणात टिकून राहिल अशी अपेक्षा बाळगतो. आपल्याला एक वर्षानंतर निवडणूकीला सामोरे जायचे आहे. त्यासाठी पुढील कारकीर्दीबाबत शुभेच्छा देतो. आपण पुढील कारकीर्दीसाठी सर्वांना सहकार्याची भुमिका घेऊन या शहरवासियांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा बाळगतो. तुम्ही आजपर्यंत जे सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद. मी आता मी स्टिवन मेंडोंसा स्थायी समितीचे सभापती झाल्याचे डिक्लेअर करतो आणि जाता जाता महानगरपालिकेने जो मोबाईल दिला होता तो श्री. खतगावकर साहेबांना परत देतो. आज खरोखर आनंदाचा दिवस आहे. आता नवरात्रोत्सव चालू आहे आणि पाच दिवसानंतर दसरा येणार आहे. त्यामुळे दसरा आणि नवरात्रोत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा देतो. हे वर्ष सगळ्यांना आनंदाचे जावो अशी अपेक्षा बाळगतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

**मा. सभापती :-**

आपण सर्वांनी मला बिनविरोध निवडून दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. मी प्रत्येक वेळेला तुमच्या बरोबर आहे. तुमची मागच्या वर्षीची सर्व कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न करेन. तुम्ही सर्व कामे माझ्या जबाबदारीवर टाकाल आणि कामे पूर्ण होतील असे नाही. जर तुम्ही माझ्याबरोबर असाल तर कामे नक्कीच पूर्ण होतील. आपण सर्वांनी गतीने कामे करावीत अशी सर्वांकडून अपेक्षा बाळगतो. या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.१० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**